INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# म.फुले व सत्यशोधक समाज - एक चिकित्सक अभ्यास
# (Mahatma Phule and Satyashodhak Samaj: A Therapeutic Study)

**प्रा.डॉ. कांतराव किसनराव कलाणे**
इतिहास विभाग प्रमुख,
प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय, नेकनुर
E-mail: kalanekantrao@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/06.2022-42519777/IRJHIS2206020

**प्रस्तावना** :-

19 व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या समाजसुधारकांमध्ये महात्मा जोतिराव फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.या देशामध्ये फक्त दोनच महात्मा होऊन गेले त्यापैकी एक म्हणजे म.फुले व दुसरे म.गांधी.ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसुधारणा व देशहितासाठी खर्च केले.कितीही संकटे आली तरी आपल्या विचारापासून ते तसूभरही ढळले नाहीत.या दोघांच्याही कार्याचा, त्यागाचा संपूर्ण महाराष्ट्रास आजही सार्थ अभिमान आहे. नव्हे त्यांच्या विचाराच्या शिदोरीवरच आज देश टिकूण आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

महात्मा फुले यांनी केवळ शेतकरी, कष्टकरी दलित समाज आणि स्त्रियांच्या उध्दाराचेच कार्य केले नाही तर 'सत्यशोधक समाज' स्थापन करून त्याद्वारे सर्व बहुजन समाजातील अज्ञान नाहिसे करण्याचा प्रयत्न केला. समाज परिवर्तनासाठी त्यांनी आयुष्यभर प्रतिगामी विचारांच्या समाजाशी लढा दिला.सामाजिक समतेसाठी चळवळ सुरू करून ती यशस्वी करून दाखवली.म्हणूनच म.फुलेंचा गौरव करताना प्रसिध्द चरित्रग्रंथ लेखककार धनंजय कीर म.फुले यांचा उल्लेख 'समाजक्रांतीचे जनक' असा करतात.आज देशात आणि राज्यात मुलभूत हक्क आणि अधिकारासाठी ज्या चळवळी चालू आहेत त्याची पायाभरणी म.फुले यांनी केली होती.प्रस्तूत शोधनिबंधातून म.फुले यांच्या 'सत्यशोधक समाजावर' प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**उद्देश** :-

प्रस्तूत शोधनिबंध सादर करताना खालील उद्देश नजरेसमोर ठेवण्यात आले आहेत.

1) म.फुले यांच्या सत्यशोधक समाजाचे सार जाणून घेणे.

2) म.फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजामागची भूमिका जाणून घेणे.

3) सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून म.फुले यांनी मांडलेले विचार आजच्या समाजापर्यंत पोहोचविणे.

4) आजही सत्यशोधक समाजाचे विचार बहुजन समाजास तारक आहेत हे पटवून देणे.

**गृहितके** :-

1) म.फुले हे कर्ते समाजसुधारक होते.

2) म.फुले यांचे विचार आजही बहुजन समाजापर्यंत पाहिजे तेवढया प्रमाणात पोहोचले नाहीत.

3) सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून मांडलेले विचार सामाजिक ऐक्य राखण्यास मदत करतात.

4) म.फुले यांच्या विचारांची आजही बहुजन वर्गास सामाजिक, धार्मिक गुलामगिरीतून मुक्ती मिळण्यासाठी मोठया प्रमाणात गरज आहे.

**सत्यशोधक समाजाची स्थापना** :-

म.फुले यांनी सामाजिक सुधारणा चळवळीस व्यापक रूप देण्यासाठी, बहुजनांची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी, त्याचा ग्रामीण भागात प्रचार व प्रसार करण्यासाठी पुणे येथे दि.24 सप्टेंबर, 1873 रोजी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. (1) मानवता, बुध्दीप्रामाण्य आणि व्यक्तिस्वातंत्र्य या प्रमुख तत्वावर म.फुले यांचा सत्यशोधक समाज आधारित होता. सत्यशोधक समाज ही एका विशिष्ट समाज वा धर्माचे नेतृत्व करणारी चळवळ नसून ती बहुजन समाजाची एक कार्यप्रवण चळवळ होती, हे त्या चळवळीचे उद्देश व तत्व पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते.सत्यशोधक समाजाची स्थापना करून म.फुले यांनी आपले विचार कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला.बहुजन समाजास सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे हे सत्यशोधक समाजाचे प्रमुख उद्दिष्ट होते.ब्राम्हणांचे कसब, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, शेतकऱ्यांचा आसूड इ.म.फुले यांच्या ग्रंथातून सत्यशोधक समाजाच्या उद्दिष्टांची चर्चा केलेली आहे.या समाजाद्वारे एक प्रभावी संघटना उभी करून वरिष्ठ वर्गाविरूध्द एक व्यापक संघर्ष उभा करणे हाच त्यामागिल उद्देश होता."म.फुले यांचा मुख्य लढा धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिकइ.क्षेत्रातील ब्राम्हणी वर्चस्वाविरूध्द होता.त्यासाठी त्यांनी सतत 'आर्यभट' ही संज्ञा वापरली आहे." (2) सत्यशोधक समाज हा म.फुले यांच्या मुख्य लढयानी एक भाग होता.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून जोतीरावांची निवड झाली.सत्यशोधक समाजाचे सभासद होण्यासाठी कुठल्याही जाती -धर्माचे बंधन नव्हते. शुद्र आणि अतिशुद्र यांची ब्राम्हण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची अन अधिकारांची शिकवणूक देणे, आणि ब्राम्हणी शास्त्रांच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय - धोरण होते. (3) याच ध्येय - धोरणाच्या पूर्ततेसाठी म.फुले यांनी आपले आयूष्य खर्ची केले. विचाराप्रमाणे कृती करणे हा त्यांचा स्वभाव होता, ते आपल्या ध्येय - धोरणाशी अतिशय प्रामाणिक होते.

**सत्यशोधक समाज स्थापनेचा उद्देश** :-

सतत 15 वर्षे म.फुले हे आपले विचार जाहीर सभा, पत्रके आणि पुस्तिकांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करत होते. पांढरपेशा वरिष्ठ वर्ग आणि प्रामुख्याने ब्राम्हण वर्ग आपल्या चळवळीविषयी सहानुभूती दाखविणार नाही; एवढेच नाही तर ते अधिक असहिष्णू बनतील, आपले अधिकार, सत्ता, सवलती आणि दर्जा ते सहजासहजी सोडणार नाहीत अशी म.फुले यांना पक्की खात्री होती. कनिष्ठ वर्गांना शुद्रातिशूद्रांना आपले राजकीय,

सामाजिक आणि धार्मिक हक्क मिळवायचे असतील तर त्यासाठी एक व्यापक चळवळ उभी करावी लागेल, असे फुले यांना वाटत होते, यातूनच आपल्या चाहत्यांशी व अनुयायांशी चर्चा करून व भाषणाद्वारे चळवळीच्या मार्गदर्शनाला एका मध्यवर्ती संस्थेची कशी गरज आहे हे पटवून दिले. शेवटी सर्वांच्या विचाराने 'सत्यशोधक समाज' ही संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेचे उद्देश पुढीलप्रमाणे होते. [4]

1) भट, जोशी, ब्राम्हण यांच्या दास्यातून शेतकरी, कष्टकरी, शूद्रातीशूद्र यांची मुक्तता करणे.
2) मतलबी धर्म ग्रंथांच्या आधारे होणारी बहुजनांची लूट थांबवणे.
3) बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करून देऊन जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट करणे.
4) देव व भक्त यांच्यामध्ये दलालाची भूमिका वठविणारी भटशाही नष्ट करणे.
5) बहुजन समाजाला एक व्यासपीठ तयार करून देऊन त्यावरून सत्याचा आग्रह धरून समाजात जागृती निर्माण करणे.

**सत्यशोधक समाजाची तत्वे** :-

1) ईश्वर निर्गूण निराकार आहे.
2) ईश्वर एकच असून तो सत्य स्वरूप आहे.
3) कोणताही ग्रंथ सर्वांशी प्रमाण व ईश्वरप्रणीत नाही.
4) मनुष्य जातीने नव्हे तर गुणाने श्रेष्ठ ठरतो.
5) परमेश्वर सावयव रूपाने अवतार घेत नाही.
6) आईस भेटण्यास किंवा बापास प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्यांची गरज नसते त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यास किंवा भेटण्यास पुरोहिताची किंवा गुरूची गरज नाही.
7) वरिल तत्वे कबूल असल्यास कोणासही सभासद होता येते. [5]

सत्यशोधक समाजाची वरील प्रमाणे उद्देश व तत्वे पाहिल्यानंतर आपणास म.फुले यांच्या डोळसपणाची साक्ष पटते.बहुजन, शेतकरी, कष्टकरी, अस्पृश्य समाजाला अज्ञान - अंधश्रध्देच्या गर्जेतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी जे अहोरात्र कार्य केले ते आजही लाखमोलाचे व प्रेरणादायी आहे.

**सत्यशोधक समाजाच्या सभासदांनी घ्यावयाची प्रतिज्ञा** :-

सत्यशोधक समाजाचा सभासद होण्यासाठी कोणत्याही अटी नव्हत्या. जाती - धर्माची बंधने नव्हती, मात्र सभासदाला पुढीलप्रमाणे प्रतिज्ञा घ्यावी लागे व त्याचे पालन करावे लागे. तसेच खंडेराय हया दैवतापुढे बेलपत्र उचलावे लागे.

"सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत, सबब ती माझी भावंडे आहेत, अशा बुध्दीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची, पूजा भक्ती अगर ध्यानधारणा करतेवेळी अगर धार्मिक विधीचे वेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही, दुसऱ्यांनाही तसेच वागण्याबद्दल मी उपदेश करीन. मी माझ्या मुलांमुलींना सुशिक्षित करीन. मी नेहमी राजानिष्ठेने वागेन. परमेश्वरास व सत्यरूपी परमेश्वरास साक्ष ठेवून मी ही प्रतिज्ञा करीत आहे. या प्रतिज्ञेप्रमाणे वागण्यास मला सामर्थ्य येईल

अशा प्रकारे आयुष्यक्रम गुजरण्यास योग्य प्रकारे मदत तो मला करो." [6]

अशा प्रकारची प्रतिज्ञा घेऊन त्या प्रमाणे वागणे हे सत्यशोधक समाजातील सभासदाचे कर्तव्य होते.विज्ञान व बुध्दी प्रामाण्यावर आधारित ही प्रतिज्ञा होती, तसेच राजनिष्ठेचे पालन हाही भाग यात आहे.मुळात इंग्रजी राजवटीवर फुल्यांचा दृढ विश्वास होता. इंग्रज राजवट ही आमच्यासाठी वरदान आहे अशी त्यांची भूमिका होती. ही राजवट आहे तोवर आम्ही आमचा विकास करून घेतला पाहिजे व ब्राम्हणांच्या धार्मिक, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त झाले पाहिजे, असे फुले म्हणात.पुढे ते असेही सांगतात की, "इंग्रज लोक आज आहेत उद्या नाहीत, ते आपल्या जन्मास पुरतील म्हणून कोणाच्याने ते खास करून सांगवत नाही.यास्तव या लोकांचे राज्य या देशात आहे तोच आपण सर्व शूद्रांनी जल्दी करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वातून मुक्त व्हावे, यामध्ये मोठा शहाणपणा आहे." [7]

म.फुले हे बुध्दीवादी विचारवंत आणि मानवतावादी क्रांतीकारक होते.विकारापेक्षा विचाराला महत्व देणारे होते, म्हणूनच त्यांना बहुजनांची भट, ब्राम्हणांच्या दास्यातून मुक्तता होण्यासाठी इंग्रज राजवट जवळची व महत्वाची वाटली.

**सत्यशोधक समाजाचा प्रचार आणि प्रसार** :-

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेवेळी महाराष्ट्रातील निरनिराळया महत्वाच्या केंद्रातून साठ कार्यकर्ते जमले होते.त्यांच्यामध्ये प्रचंड उत्साह होता. आपली चळवळ संघटित करून तिच्याद्वारे आपला संदेश सर्व ठिकाणी पोहोचवावा या निर्धाराने व ध्येयाने स्थापन केलेली महाराष्ट्रव्यापी अशी समाजसुधारणेची महाराष्ट्रातील ही पहिली चळवळ होय.

सत्यशोधक समाजाला फार मोठया बुध्दीवंतांचा पाठींबा होता असे नाही. त्यांचा तत्वज्ञानी पुरूष हा साधा, प्रामाणिक शेतकरी होता. तो सामान्य शेतकरी असला तरी त्याला आंगिक प्रेरणा आणि बुध्दीप्रामाण्याची देणगी निसर्गत:च लाभली होती. सत्यशोधकाच्या कार्याच्या प्रेरणेचे स्थान हृदय होते.त्यांची भाषा जनतेची होती.त्यांच्या प्रचाराची स्थळे सभा, बैठक व शेतावरील मळणीचे स्थान. सत्यशोधक प्रचारकांचा पोषाख म्हणजे एक घोंगडी, पागोटे व धोतर आणि हातात डफ. आपल्या भाषणात ते शेतकऱ्यांच्या कर्जाचा उल्लेख करीत.धर्मविधी व संस्कार यांच्या जाचाखाली शेतकऱ्यांचे कसे नुकसान होते व जो काही त्यांच्या गाठी थोडा पैसा असतो तो धुर्त ब्राम्हण भिक्षुक कसा लुबाडतो हयाकडे ते शेतकऱ्यांचे आणि सामान्य माणसाचेलक्ष वेधीत.आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे असे ते सांगत. तसे केले म्हणजे त्यांना चांगले काय नि वाईट काय ? कायदा, धर्म, देव म्हणजे काय ?हे समजेल, असा त्यांना उपदेश करीत.सत्यशोधक समाजाचे प्रचारक शेतकरी कुटूंबातलेच असल्यामुळे त्यांच्या कार्यात आणि प्रचारात पांडित्य आणि बुध्दीमत्ता यांचे तेज दिसून येत नसे. तथापि त्यांची कार्यशक्ती आणि तळमळ ही फारमोठी होती. [8] जोतिरावांनी उभी केलेली ही चळवळ महाराष्ट्रभर पसरली. अनेक गावातून मार्गदर्शनासाठी त्यांना आमंत्रणे येऊ लागली.अशाच एका आमंत्रणावरून ते सत्यशोधक समाजाची शाखा उघडण्यासाठी मुंबईला गेले.अनेक ठिकाणी त्यांनी उपदेशपर व्याख्याने दिली.गरीब लोकांना सत्यशोधक समाजाचे ध्येय विशद करून सांगितले.तसेच चळवळीस पाठींबा द्यावा अशी विनंती केली.ब्राम्हणांच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय आहे, असे सामान्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.कनिष्ठ वर्गाने काबाडकष्ट करून हमालाचे किंवा पाणक्याचे जीवन जगण्यापेक्षा मानवी हक्क संपादन करून आपली उन्नती करावी असे सत्यशोधक समाजाचे ध्येय आहे, असे जोतिराव सांगत.त्यांच्या या विचाराचा आणि

कार्यकर्तृत्वाचा ठसा संबंध महाराष्ट्रभर दिसू लागला.लवकरच सत्यशोधक समाज ही चळवळ लोकचळवळ म्हणून महाराष्ट्रभर नावारूपास आली.

**फुलेंच्या सत्यशोधक विचारांची आज खरी गरज** :-

म.फुले यांनी धार्मिक कर्मकांडातून सामान्य जनतेची मुक्तता करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना करून पुरोहितशाही विरूध्द बंड पुकारले.सर्वांचा किंबहुना विश्वाचा एकच निर्भिक आहे.सर्व मानव जीवसृष्टीचा निर्मिक एकच आहे. त्याच्यापर्यंत पोहोचण्यासाठी मध्यस्याची, दलालाची, पुरोहिताची गरज काय ?हा त्यांचा खरा सवाल होता.त्यांनी धार्मिक कर्मकांड - थोतांडविरूध्द बंड पुकारले.समाजात बोकाळलेल्या अंधश्रध्दा विरूध्द जनजागृती केली.अंधश्रध्दा दूर केल्या पण आज विज्ञानाच्या युगात विज्ञानाची कास धरणारा माणूस जेव्हा संगणकासमोर नारळ फोडून नमस्कार करतो त्यावेळी त्यांची कीव येते.महात्मा फुले यांनी मानव जातीसाठी विश्वबंधुत्वाचा पुरस्कार केला. महाराष्ट्रातील प्रत्येक चांगल्या गोष्टींचा स्वीकार करावा, ज्याला जो धर्म पटतो त्याने त्याचा स्वीकार करावा असे प्रतिपादन केले.[9] मात्र आज जाती - जातीत, धर्मा-धर्मात तेढ वाढवून सामाजिक वातावरण गढूळ करण्याचा प्रयत्न मोठया प्रमाणात केलाजात आहे. समाजाला परत देव आणि धर्म या जाळयात अडकवण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न काही राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील मंडळी करत आहेत.फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराला नख लावण्याचा प्रयत्न केला जात आहे.अशा काळात म.फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या तत्वांचा प्रचार - प्रसार होण्याची खरी गरज आहे.प्रसिध्द विचारवंत आ.ह.साळुंखे म्हणतात, या देशात जेव्हा जेव्हा सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात क्रांती झाली तेव्हा ती मोडून काढण्यासाठी प्रतिक्रांती झाली.आजही फुले-शाहू-आंबेडकरांच्या क्रांतीविरूध्द प्रतिक्रांती सुरू झाली आहे.ती मोडून काढण्यासाठी बहुजनांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष** :-

1) सत्यशोधक समाजाचे तत्वज्ञान अखंड मानव जातीच्या कल्याणाचे होते.
2) सत्यशोधक समाज ही विशिष्ट समाज किंवा धर्माचे नेतृत्व करणारी चळवळ नसून ती बहुजन समाजाची एक कार्यप्रवण चळवळ होती.
3) सत्यशोधक समाजाचा मुलाधार शेतकरी, कष्टकरी, सामान्य जनता हा होता.
4) म.फुले यांचा सत्यशोधक समाज विज्ञान आणि बुध्दीप्रामाण्यावर आधारित होता.
5) म.फुलेंचे विचार आणि सत्यशोधक समाजाची तत्वे यापासून आजही बहुजन समाज खूप दूर आहे.
6) सत्यशोधक समाजाच्या तत्वाची आजही महाराष्ट्रातील बहुजन समाजाला गरज आहे.
7) बहुजन समाज आजही धार्मिक कर्मकांड आणि जातीच्या बंधनात अडकलेला दिसून येतो.

**सारांश** :-

तत्वचिंतक जोतिराव हे 'सत्यमेव जयते' हया अमर संदेशाचा पुनरूच्चार करणारे आधुनिक भारतातील पहिले महापुरूष होत. केवळ राजकीय गुलामगिरीच नव्हे; तर धार्मिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील सर्व प्रकारची गुलामगिरी नष्ट करणारे उत्कृष्ट रसायन म्हणजे जोतिरावांचे तत्वज्ञान मानवता, बुध्दीप्रामाण्य, सत्य, समता,

स्वातंत्र्य, बंधुभाव, विज्ञाननिष्ठा, शोषण विरोध, न्याय, श्रमप्रतिष्ठा हे त्यांच्या तत्वप्रणालीचे आधारस्तंभ आहेत. आपले संपूर्ण आयुष्य या महामानवाने शेतकरी, कष्टकरी, शुद्रातिशूद्र, स्त्रिया यांच्या उध्दारासाठी घालविले.ब्राम्हण, पुरोहित यांच्या धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीतून बहुजन समाज बाहेर काढण्यासाठी त्यांनी अहोरात्र श्रम केले.

महाराष्ट्रातील बहुजन समाजाला दुर्दैवाने म.फुले अजूनही पुरते समजले नाहीत.अशा महापुरूषांना जातीच्या चौकटीत बांधले जात आहे.त्यामुळे आजच्या पिढीतील संवेदनक्षम तरूणांची जबाबदारी खूप वाढते.महापुरूष काल जसे महत्वाचे होते तसेच ते आज व उद्याही महत्वाचे आहेत.कारण उद्याचा प्रवास करतांना अशा महापुरूषांच्या विचारांची शिदोरी सोबत असणे आवश्यक आहे, तरच आपण योग्य दिशेने प्रवास करू शकू. आज आपला समाज पुन्हा जाती - धर्माच्या नावाखाली स्वत:ची पोळी भाजणाऱ्या स्वार्थी, संधीसाधू, ढोंगी राजकारणी मंडळी व धार्मिक क्षेत्रातील भोंदू लोकांचा बळी जात आहे. समाज जोडण्याऐवजी तोडण्याचे व त्यांच्यातील अज्ञान - अंधश्रध्दा दूर करण्याऐवजी ते त्यातच कसे गुंतून राहतील याचेच प्रयत्न मोठया प्रमाणात होताना दिसून येतात.अशा समाजविघातक प्रवृत्तींना ठेचून काढण्यासाठी म. फुले यांचे सत्यशोधक विचार तरूणांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतील यात शंका नाही.

**संदर्भ सूची** :-


1) कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले. आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, पुनर्मुद्रण, 2000 पृष्ठ - 144
2) परदेशी प्रतिमा, (संपा.) सत्यशोधक जागर (मासिक), अंक 46, डिसेंबर, 2011.
3) कीर धनंजय, उपरोक्त, पृष्ठ - 145
4) कीर धनंजय, उपरोक्त, पृष्ठ - 146
5) बागल, माधव खंडेराव (संपा.), सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ, पृष्ठ -109
6) कीर धनंजय, उपरोक्त, पृष्ठ - 145
7) महात्मा फुले समग्र वाङ्मय, पृष्ठ - 136
8) कीर धनंजय, उपरोक्त, पृष्ठ - 149
9) परदेशी प्रतिमा (संपा.), सत्यशोधक जागर (मासिक) अंक 69, पृष्ठ - 16